# प्रथम सत्रांत चाचणी (२०२२–२३)

**विषय - मराठी**

वेळ **- 2.30** तास　　　　**इयत्ता १2 वी.**　　　　**गुण-५0**

---

**प्रश्न 1 पुढील उतारा वाचा आणि दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

कामापुरते आणि कामासाठी वाहन आणि आटोक्यात राहील एवढेच वेग हे तंत्र अनुसरले तर जीवन अर्थपूर्ण होईल आपले जीवन अधिक प्रमाणात आपल्या वाट्याला यावे येते कृतार्थ देणे जगताप अनुभवता यावे यासाठी उसंत लाभावी म्हणून वाहनांचा वापर करायला हवा प्रत्यक्षात घडते ते वेगळे इतरांशी मानसिक स्पर्धा करण्यासाठी आपल्या ऐश्वर्याचे प्रदर्शन घडवण्यासाठी गरज नसताना कर्ज काढून वाहने खरेदी करणारी माणसे समाजात आढळतात कोणतेही मान महत्वाचे काम नसताना पत्नीला मागच्या बाजूला बसवून आधुनिक दुचाकीचे सहज फेरफटका मारून आले म्हणजे अनेकांना बरे वाटते.

**(क) कृती करा.** ( २)

लेखकांनी सांगितलेली वाहन

खरेदी करण्यासाठी २ कारणे

**(ख) रिकाम्या जागा भरा.** ( २)

(१) वाई सातारा अशा वाहनांचा उपयोग होऊ शकतो जर...

..........................................................

(२) इतरांशी मानसिक स्पर्धा करण्यासाठी किंवा आपल्या ऐश्वर्याचे प्रदर्शन घडवण्यासाठी माणसे................

.........................................................................................

**प्रश्न १ आ पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

सरी वाफ्यात कांदा लावते
बाई लावते
नाही कांदा ग जीव लावते
बाई लावते

काळया आईला हिरवा गोदते
बाई गोंदते
रोज मातीत मी ग नांदते
बाई नांदते

**(क) संदर्भा नुसार योग्य जोड्या लावा.** (२)

| | |
|---|---|
| (१) नाही कांदा ग जीव लावते. | (अ) गोंदण याच्या हिरव् नक्षी प्रमाने शेत पिकाणे सजवते. |
| (२) काळया आईला हिरवे गोंदते. | ( आ) स्वतःच्या जीवाचं जणू कांद्याच्या रोपाच्या रूपात लावते. |

(ख) कवितेतील स्त्री करिता असलेली दोन कामे सांगा. (२)

**प्रश्न २( अ) पुढील उतारा वाचा आणि दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

संगीताच्या सात सुरांमध्ये तर सात जन्म पुरेल एवढा आनंद भरून राहिलेला आहे आपलं शास्त्रीय संगीत ही एक आनंदाची इस्टेट आहे. कुमार गंधर्व ,पंडित भीमसेन जी, पंडित जसराज ,किशोर अमोंकर याचं गाणं आपण ऐकू शकतो. हे केवळ भाग्यच म्हणायला हवं .आत्मिक आनंद म्हणतात, तो यापेक्षा फारसा वेगळा नसावाच .आत्म्याच्या या भाषेत गाता आलं नाही तरी ऐकता येतच ना ? कलाकार मंडळी खरी जगतात ती कलेच्या मस्तीतच एखाद्या कलेशी आपणही दोस्ती करू शकलो , तर एका वेगळ्याच विश्वात वावरता येतं निर्मितीच्या आनंदाची नातं जोडता येतं, त्या आनंदाची जात काही वेगळीच असते ; पण कलावंत होता आलं नाही ,तरी रसिक होण्याचा आनंद अधिकार कोणीच नाकारू शकत नाही .कलेचा आस्वाद आला अनोखा आनंद हा आपणच आपला बहाल करू शकतो . निर्मिती म्हणजे ही प्रत्येकानं ताजमहल बांधायला हवा असं थोडंच आहे? पोराच्या बरोबरीने दिवाळीला किल्ला करण्याची ही मौज असतेच. शिकण्यातला आनंद हा तर आयुष्यभर न संपणारा असतो.

**(क) पुढील चौकटी पूर्ण करा.** (२)

(१) आनंदाची इस्टेट- (. )

(२) आयुष्यभर न संपणारा- (. . )

**(२) योग्य की अयोग्य लिहा.** (२)

१) शिकण्यातला आनंद तात्पुरता असतो.

२) आत्म्याच्या भाषेत जाता आले नाही तरी ऐकता येऊ शकते.

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा वेगळा!

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!

**(क) एका शब्दात उत्तरे लिहा.** ( २)

१) कवीची सदैव सोबत करणारी

(२) कवीचा विश्वास घात करणारे

**(ख) पुढील शब्दाचे अर्थ लिहा.** ( २)

१) गुंता-

२) लळा-

**(ग) कवितेतील यमक साधणारे चार शब्द लिहा.**

( ५)

**प्रश्न ३ (क) अनुने व्यक्त केलेल्या विचारातून डॉक्टरचा पेक्षा आणि नर्स चा पेशा यातील फरक स्पष्ट करा. (५ मुद्दे)**

**(ख) पुढील नातेसंबंध लिहा.** (२)

१) अनु आणि आबा
२) अनु आणि सुनीता

**(ग) तुमच्या शब्दात माहिती लिहा.** (४)

१) भिडे दांपत्याची सामाजिक बांधिलकी
२) टॅक्सी ड्रायव्हर चा स्वभाव विशेष

**प्रश्न ४( क) पुढील व्यक्तीची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.** (५)

१) भाजीवाला (५ मुद्दे)

**(ख) पुढील मुद्याविषयी पूर्वतयारी(४ मुद्दे).** ( ४)

१) मुलाखतीची पूर्वतयारी
२) मुलाखतीचा समारोप

**( ग) मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी लिहा.** ( २)

**प्रश्न ५ व्याकरण.** ( १०)

**पुढील वाक्याच्या कोणत्या प्रकारात मोडतात ते लिहा.**

१) यावर्षी पाऊस खूप पडला.
२) प्रार्थनेसाठी रांगेत उभे राहा.
३ मराठीत प्रयोगाचे मुख्य तीन प्रकार कोणते? (२)

**पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.**

४) तनाने सैनिकांना सूचना दिली.
५) मुले प्रदर्शनातील चित्रे पाहतात.
६) शेतकऱ्याने फुलांची रोपे लावली.
७) आकाशात ढग जमल्यामुळे आज लवकर सांजा वले.

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य रूपांतरण करा.**

८) तुम्ही कोणाशी वाईट बोलू नका. (होकारार्थी करा)
९) पांढरा रंग कोणाला आवडत नाही. (प्रश्नार्थक करा)